F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६/४८७ ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in , वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ : पोस्टाने/ ईमेल द्वारे/ संकेतस्थळ**

क्र. : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/3<3
दि. - ०८/ १२ /२०२०

प्रति,
सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
(मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था)
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- सन २०२०-२१ साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केंद्र शासनाच्या गुणवत्ता - नि - साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स) योजनेच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ - १) या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/२०५ दि.०४/०९ /२०२०
२) या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३२४ दि. २९/०९ /२०२०
३) या कार्यालयाचे पत्र क्र : १८/तंशिसं/एमसीएम/संस्था-पत्र/२०२०-२१/३५४ दि. ११/११ /२०२०
४) अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र : F.No.१५/१३/२०२०-SS-MoMA दि.०३/१२/२०२०

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून सन २०२०-२१ साठीचे नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील (NSP Portal संकेतस्थळ-www.scholarships.gov.in) **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स)** योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचनांनुसार उपरोक्त विषयांबाबत या कार्यालयाकडून संदर्भीय १ ते ३ च्या पत्राद्वारे सूचित करण्यात आलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या केंद्र शासनाच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार, सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येते की,

१. उपरोक्त नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनेच्या कामकाजाकरिता नियमित (Regular) अधिकारी/कर्मचारी यांची Institute Nodal Officer (INO) म्हणून नेमणूक करण्यात यावी. (सदर अधिकारी/कर्मचारी हे कंत्राटी स्वरुपाचे नसावेत.)
२. Institute Nodal Officer (INO) हा पोर्टलवरील योजनांच्या अंमलबजावणीसाठी व विद्यार्थ्यांच्या अर्जांच्या तपासणीसाठी (प्रलंबित / मंजूर / नामंजूर) जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.
३. तसेच संस्थेच्या लॉगीन आयडी मध्ये प्राप्त होणारे विद्यार्थ्यांचें तपासणी करुन मंजूर केलेले अर्ज व उपरोक्त योजनेच्या लाभासाठी कागदपत्रे जसे विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्पन्नाचा दाखला (Income Certificate), गुणपत्रिका, जन्म दाखला (Birth Certificate), आधार कार्ड छायाप्रत, रहिवासी दाखला (Domicile Certificate) इत्यादी वर्षनिहाय, नवीन व नुतनीकरणनिहाय पुढील कमीत कमी ५ वर्षाकरीता जतन करावी आणि आवश्यकतेनुसार मागणी केल्यास Institute Nodal Officer यांनी उपलब्ध करुन द्यावे. Institute Nodal Officer (INO) यांनी संस्थेच्या प्राचार्यांचे पर्यवेक्षणांतर्गत योजनेचे सर्व कामकाज करावे. योजनेच्या प्रभावी व बिनचूक अंमलबजावणीसाठीची तसेच विद्यार्थी हा एकापेक्षा जास्त योजनांचा लाभार्थी

नसेल तसेच संस्थेकडून योजनेच्या लाभासाठी मंजूर केल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यापैकी कोणताही विद्यार्थी हा बनावट विद्यार्थी (Bogus / Fake applicant) नसेल याबाबतची खात्री संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: करावी.

४. Institute Nodal Officer ( INO ) यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्ड कोणाशीही सामायिक (share) करु नये व वेळोवेळी पासवर्ड ( Change the password with frequetly ) बदलावा.

५. विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर / नामंजूर करतेवेळी संस्थेच्या Institute Nodal Officer ( INO ) यांनी विद्यार्थी Day Scholar आहे की Hosteller याबाबत काळजीपूर्वक तपासणी करावी. कारण काही विद्यार्थ्यांचे अर्जामध्ये विद्यार्थी वसतिगृहामध्ये न राहाता देखील Hosteller असे Mark केलेले अर्ज मंजूर करुन पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थी Hosteller असल्यास त्याचे नावाची भाडे भरल्याची पावती / भाडे करारपत्र या सहपत्राची छाननी न चुकता करावी.

६. संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी मध्ये प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज अंतिम मुदतीपर्यंत प्रलंबित न ठेवता त्वरीत छाननी करुन मंजूर / नामंजूर करावे. जर अंतिम मुदतीनंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहिले व कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांची राहील.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,तंत्रशिक्षण चालनालय,मुंबई.

**प्रत - यांना माहितीसाठी व त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व त्यांच्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संबंधित सर्व संस्थांना सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद
२) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ००१.
३) मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०० ००१.
४) मा. संचालक, इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाउन्टस ऑफ इंडिया, आयसीएआय टॉवर, प्लॉट नं. सी-४०, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा ईस्ट, मुंबई - ४०० ०५१.
५) मा. संचालक, कला संचालनालय, सर जे जे स्कुल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-० १.
६) मा. संचालक, शिक्षण संचालनालय ( उच्च शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१.
७) मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे - ४११ ०३७.
८) मा. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-०१.

**प्रत - यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

1) Head of the Institute, Indian Institution of Technology (IIT), Main Gate Rd, IIT Area, Powai, Mumbai, Maharashtra 400076.
2) Head of the Institute, National Institute of Industrial Engineering, Vihar Lake, P.O. NITIE, Mumbai – 400 078.
3) Head of the Institute,National Institute of Fashion Technology, Plot no. 15, Service Road, Sector 4, Kharghar, Navi Mumbai, Maharashtra 410210 .
4) Head of the Institute,Visvesvaraya National Institute of Technology, S Ambazari Rd, Ambazari, Nagpur, Maharashtra 440010.

**प्रत - यांना माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

***************